क्रमांक : संकीर्ण-02/2018/23

# - घोषणा -

**आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीमधील उमेदवारांच्या प्रोफाईलमध्ये वर्गवारीचे दावे बदलण्यासंदर्भात.**

आयोगाच्या **www.mahampsc.mahaonline.gov.in** या ऑनलाईन अर्जप्रणालीमध्ये शासन परिपत्रक, साप्रवि- क्रमांक: एसआरव्ही- १०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट,२०१४ रोजीच्या शासन परिपत्रकातील तरतुदीच्या अनुषंगाने उमेदवारांना त्यांच्या प्रोफाईलमधील वर्गवारीचे दावे बदलण्याची मुभा देण्यात आलेली नव्हती.

शासनाने दिनांक १३ ऑगस्ट,२०१४ रोजीच्या परिपत्रकास अनुसरुन शासन शुद्धिपत्रक, क्रमांक : संकीर्ण-१११८/प्र.क्र.३९/१६-अ, दिनांक १९ डिसेंबर,२०१८ रोजी शुद्धीपत्रक निर्गमित केले आहे. सदर, दिनांक १९ डिसेंबर,२०१८ रोजीच्या शुद्धीपत्रकातील तरतुदीनुसार यापुढील सर्व परीक्षांकरिता मागासवर्गीय उमेदवारांचाही गुणवत्तेच्या आधारे अराखीव समांतर आरक्षित पदांसाठी निकालाच्या वेळी विचार करणे आवश्यक आहे. सदर बाब विचारात घेता, यापुढे आयोगामार्फत उमेदवारांचे प्रोफाईलमधील वर्गवारीचे दावे उमेदवारांच्या स्तरावर ऑनलाईन बदलण्यास मुभा देण्यात येत आहे. वर्गवारीतील दाव्यांमध्ये बदल करताना **SEBC** वर्गवारीतील उमेदवार वगळता अन्य मागासवर्गीय उमेदवारांना त्यांच्या प्रोफाईलमध्ये वर्गवारी प्रमाणपत्राचा क्रमांक व जिल्हा नमूद करणे अनिवार्य करण्यात आले आहे.

उपरोक्त वर्गवारीमधील बदल दिनांक १९ डिसेंबर,२०१८ रोजीच्या शुद्धीपत्रकानुसार आयोगामार्फत सध्या विज्ञापित करण्यात आलेल्या जाहिरात क्रमांक ५०/२०१८ तसेच, यापुढे विज्ञापित करण्यात येणा-या सर्व जाहिरातींस अनुसरुन सादर केलेल्या अर्जांकरिता लागू राहतील. म्हणजेच सदर बदल या जाहिरातींपूर्वी विज्ञापित करण्यात आलेल्या जाहिरातींस तसेच परीक्षांकरीता सादर केलेल्या अर्जास पूर्वलक्षी प्रभावाने लागू ठरणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

दिनांक : २६ डिसेंबर, २०१८

सचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग